www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : २४३ रविवार दि : १८ मे, २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

द•ख•ल

## आज पनवेलमध्ये भव्य तिरंगा यात्रा

**पनवेल (प्रतिनिधी):** ऑपरेशन सिंदूर अंतर्गत आपल्या सशस्त्र दलांनी पाकिस्तानमधील दशहतवादी अड्डे उध्वस्त करून पाकिस्तानला योग्य तो धडा शिकवला. भारतीय संरक्षण दलाच्या या गौरवपूर्ण कामगिरीच्या सन्मानार्थ राष्ट्रीय एकता आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वाच्या सन्मानार्थ पनवेल भाजपतर्फे रविवार दिनांक १८ मे रोजी सकाळी ९ वाजता 'भव्य तिरंगा यात्रा' आयोजित करण्यात आली आहे. या *तिरंगा पदयात्रेला पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरुवात होणार आहे. यामध्ये नागरिकांनीही सहभागी व्हावे असे आवाहन भाजपतर्फे करण्यात आले आहे.

## पनवेल मध्ये द आर्ट्सी क्राफ्टसी समर कॅम्प मोठे उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** गेल्या दोन वर्षापासून द आर्टसी क्राफ्टसी समर कॅम्प व्यवस्थापक सौ. स्वप्ना साखरे आणि संस्थापक सौ. सोनल थोरात यांच्या द आर्टसीक्राफ्टसी संस्थे कडून तीन वर्षांवरील मुलांसाठी समर कॅम्प रचना हाईट, पनवेल येथे मंगळवार दि ७ मे २०२५ ते शुक्रवार दि १७ मे २०२५ रोजी भरविण्यात आला. या कॅम्प मध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेत आपल्या कला गुणांचे उत्तम सादरीकरण केले तसेच मुलांची बौद्धिक क्षमता वाढविण्यासाठी मेंदूचे व्यायाम घेण्यात आले.सदर शिबिरात गोष्टी सांगणे, खेळ,वारली आर्ट,OHP शीटवर रांगोळी, मुलांना झाडांचे महत्त्व सांगून झाडे लावायला शिकविले,व्यायाम, डान्स, चित्रकला, पॉटरी व्हीलवरिल भांडी,आगीचा वापर न करता फूड बनवणे, पेपर प्लेटवर एक्वेरियम बनविले,अशाप्रकारचे विषय शिकवण्यात आले.शिबिराच्या शेवटच्या दिवशी त्यांना प्रमाणपत्र आणि आकर्षक भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले. तसेच मुलांनी व त्यांच्या पालकांनी स्वतःचे मनोगत व्यक्त केले.यावेळी भाजपा ओबीसी मोर्चा सोशल मीडिया जिल्हा प्रभारी प्रसाद हनुमंते ही उपस्थिती होते.





# "मातीशी नाळ जोडलेला एक दूरदृष्टी नेता"

## श्री परेश ठाकूर यांची प्रेरणादायी वाटचाल'

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेलच्या राजकीय आणि सामाजिक परिप्रेक्ष्यात सतत नवनवीन उपक्रम, बांधिलकी आणि लोकाभिमुख नेतृत्वाने आपली एक वेगळी छाप उमठवणारे नाव म्हणजे श्री परेश रामशेठ ठाकूर. लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब आणि त्यांचे मोठे बंधू आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासारख्या थोर नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली, श्री परेश ठाकूर यांनी महाराष्ट्राच्या नागरी, सांस्कृतिक व सामाजिक विकास क्षेत्रात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. पनवेलच्या समृद्ध आणि संस्कृतीप्रधान वातावरणात वाढलेले श्री परेश ठाकूर यांनी लहानपणापासूनच समाजसेवेचे बाळकडू घेतले. त्यांच्या वडिलांकडून, माजी खासदार श्री रामशेठ ठाकूर यांच्याकडून 'लोकांना केंद्रस्थानी ठेवून नेतृत्व' ही शिकवण त्यांनी आत्मसात केली. त्यांच्या मोठ्या बंधू आमदार प्रशांत ठाकूर यांच्याही प्रभावी नेतृत्वातून प्रेरणा घेऊन, त्यांनी ही शिकवण आपल्या जीवनात साकारली. हीच शिकवण त्यांच्या प्रत्येक टप्प्यात अधिक प्रगल्भ होत गेली.आपली सार्वजनिक सेवा यात्रा त्यांनी पनवेल महानगरपालिकेचे पहिले सभागृह नेते म्हणून सुरु केली. त्यांनी भाजप गटनेते आणि नगरसेवक म्हणून कार्यरत असताना, विकास योजना, पायाभूत





सुविधा नियोजन आणि लोकाभिमुख प्रशासन क्षेत्रात मोठा ठसा उमठवला. शिक्षण क्षेत्रातही श्री ठाकूर यांचे योगदान लक्षणीय आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि रयत शिक्षण संस्थेअंतर्गत विविध शैक्षणिक संस्थांचे अध्यक्ष आणि संचालक म्हणून त्यांनी रायगड जिल्ह्यातील शाळा आणि महाविद्यालयांना आधुनिक शिक्षण सुविधांनी समृद्ध केले, हजारो विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासाची संधी दिली.सांस्कृतिक क्षेत्रात 'अखिल भारतीय नाट्य परिषद - पनवेल शाखा'चे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी तरुण व उदयोन्मुख रंगकर्मींसाठी 'अटल करंडक' राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या माध्यमातून एक भक्कम व्यासपीठ निर्माण केले आहे. सलग ११ वर्षे चालणारी ही स्पर्धा महाराष्ट्रातील नवोदित कलाकारांसाठी एक प्रेरणास्थान ठरली आहे.क्रीडा क्षेत्रात श्री ठाकूर यांच्या दूरदृष्टीमुळे पनवेलमध्ये जिल्ह्यातील एकमेव अद्ययावत अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट अकादमीची उभारणी झाली. रामशेठ ठाकूर आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल, उलवेचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून त्यांनी स्थानिक तरुणांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अथक परिश्रम घेतात. त्यामुळे स्थानिक युवकांना क्रीडा क्षेत्रात व्यावसायिक स्तरावर पुढे जाण्यासाठी मोठी प्रेरणा मिळाली आहे.सामाजिक उत्तरदायित्वाच्या क्षेत्रातही श्री ठाकूर यांचा ठसा अमीट आहे. 'कोशिश फाउंडेशन' या मंचाच्या माध्यमातून त्यांनी व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व विकास आणि शाश्वत जीवनशैलीसाठी प्रभावी उपक्रम हाती घेतले आहेत.त्यांच्या नेतृत्वाखाली 'आमदार प्रशांत ठाकूर ट्रॉफी' वक्तृत्व स्पर्धेत १७,००० पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले असून, ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये प्रभावी वक्तृत्व कौशल्य आणि सजग नागरिकत्व रुजवण्यासाठी एक महत्वाचे व्यासपीठ ठरली आहे. पर्यावरण क्षेत्रातही त्यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत. पर्यावरणपूरक गणेशोत्सव, 'ऑक्सी पार्क', 'ग्रीन पार्क', 'मियावाकी फॉरेस्ट' यांसारख्या प्रकल्पांमुळे त्यांनी पनवेलमध्ये शाश्वत जीवन शैलीचे व नवे मापदंड निर्माण केले आहेत. श्री परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमध्ये पायाभूत सुविधांचा झपाट्याने विकास झाला आहे. रस्ते, वीज व्यवस्था, उद्याने, जलपुरवठा योजना आणि नागरी सुविधा यामध्ये त्यांच्या दूरदृष्टीमुळे परिवर्तन घडले आहे. त्यांच्या कारभाराचा मुख्य आधार म्हणजे लोकांच्या अडचणींना समजून घेऊन, लोकसहभागातून आणि शाश्वत नियोजनातून त्या सोडवण्याची त्यांची भूमिका. कुणीही त्यांच्याशी थेट संपर्क करू शकतो, हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य आहे.आपल्या वाढदिवसानिमित्त, त्यांच्या या सामाजिक समर्पित जीवनाला सलाम करत, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो – श्री परेश ठाकूर सर, आपली प्रेरणादायी वाटचाल नव्या पिढ्यांना स्फूर्ती देवो.

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!






# क्रियाशील प्रेस क्लबच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी सय्यद अकबर

## सचिवपदी साबीर शेख तर कोषाध्यक्षपदी चंद्रकांत शिर्के

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल तालुक्यासह रायगड परिसरात जीवावर खेळून बातम्या प्रसिद्ध करण्यासाठी अग्रेसर असणाऱ्या पत्रकारांची संघटना म्हणून क्रियाशील प्रेस क्लब या संस्थेची ख्याती सर्वत्र आहे. या संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १७ मे रोजी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विजय कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या दिमाखात पार पडली. यावेळी पार पडलेल्या सभेमध्ये नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली, यामध्ये कोकण डायरी वृत्तसमूहाचे संपादक तथा भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांची अध्यक्षपदी तर






सचिपदी साबीर शेख यांची निवड करण्यात आली. यामध्ये खजिनदारपदी चंद्रकांत शिर्के तर कार्याध्यक्षपदी राज भंडारी यांची निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्ष म्हणून संतोष वाव्हळ, प्रदीप ठाकरे आणि अनिल राय यांची तर सदस्यपदी विशाल सावंत, भूषण साळुंखे यांची निवड करण्यात आली.

पत्रकारिता क्षेत्रामध्ये पदार्पण करून पत्रकारितेतील विविध संघटनांच्या माध्यमातून काम करीत असताना राजकारणात देखील एक यशस्वी प्रवास सय्यद अकबर यांनी पार केला. समाज हिताचे कार्य त्यांनी केले आहे. आता क्रियाशील प्रेस क्लब पनवेलच्या अध्यक्षपदाची धुरा पुन्हा त्यांच्या हाती आल्यामुळे परिसरातील नागरिकांना पत्रकारितेच्या माध्यमातून न्याय मिळवून देवून तसेच पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी अनेक उपक्रम राबविणार असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.तालुक्यातील आदिवासी वाड्या, वृद्धाश्रम आणि दुर्बल घटकांना मदत करण्यासह संघटनेच्या पदाधिकारी व सदस्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न केले जातील. असा विश्वासही यावेळी संघटनेचे अध्यक्ष सय्यद अकबर यांनी व्यक्त केला.

# कर्जमुक्ती करीता तहसीलदार यांना निवेदन



**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**जितेंद्र खोडे / राळेगाव :** नव्यानेच महाराष्ट्र सरकार स्थापन झाले असुन शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफी करु व शेतकऱ्यांनचा सातबारा कोरा करु असे आश्वासन देऊन शेकऱ्यांची दिशा भुल करुन फसवणाऱ्या सरकार विरुद्ध किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा दैनिक देशोन्नतीचे मुख्य संपादक प्रकाश पोहरे यांच्या कर्जमुक्ती साठी आंदोलन महाराष्ट्र भर करण्यात आले. राळेगाव तालुक्यातील झाडगाव येथील अनेक शेतकऱ्यांनी किसान ब्रिगेड महाराष्ट्र यांच्यावतीने १४ मे रोजी दुपारी १ वाजता कर्जमुक्तीची मागणी करुन मागणी अर्ज घेऊन राळेगाव तहसीलदार यांच्याकडे कर्जमुक्तीची मागणी शेतकऱ्यांनी केली शेतकऱ्यांनी सातबारा कोरा करा नाही त खुर्ची खाली करा खोटे आश्वासन देणाऱ्या सरकारचा निषेध केला. झाडगाव येथील ग्रामपंचायत सदस्य तथा दैनिक देशोन्नतीचे झाडगाव प्रतिनिधी सचिन राडे यांच्या नेतृत्वाखाली अनेक शेतकऱ्यांनी कर्जमुक्ती चे अर्ज व निवेदन देण्यात आले. त्यावेळेस अँड. संदिप राडे, अफसर काझी,मनिष कुबडे,नंदु तागडे, शालीक पाल,पुरुषोत्तम बारी, रामा काळे, गुणवंत ऊताने,मारुती खडसे,भिमराव भगत, वसंता झाडे, रविन्द्र ढाले, संजय कांबळे,राहुल पुडके या सह अनेक शेतकरी उपस्थिती होते.

# मोक्ष भावेश भंडारीचे दहावी मध्ये घवघवीत यश..!

**दैनिक युवक आधार**
**गामदेवी,मुंबई प्रतिनिधी**
**गुरुनाथ तिरपणकर** : यंदा महाराष्ट्र राज्याचा दहावीचा निकाल 94.10 टक्के लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनी निकालात बाजी मारली असून उत्तीर्ण झालेल्यी मुलींची टक्केवारी 96.14 अशी आहे, तर मुलांची टक्केवारी 92.21 अशी आहे. यात शारदा मंदिर हायस्कुल, गामदेवी, मुंबई च्या मोक्ष भावेश भंडारी या विद्यार्थ्याने दहावी मध्ये दैदिप्यमान यश संपादन केले आहे. 93 टक्के मार्क्स मिळविणाऱ्या मोक्ष भंडारी याने आपल्या आई वडिलां सोबत आपल्या समाजाचे तसेच आपल्या कुटुंबियांचे देखील नाव रोशन केले आहे. साधी राहणी आणि



उच्च विचारसरणी असलेले मोक्षचे वडील भावेश सुकनराज भंडारी आणि आई मिता भावेश भंडारी, बहीण पहेल भावेश भंडारी, दादाजी - सुकनराज भंडारी आणि दादीजी - शांता सुकनराज भंडारी कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून मोक्षच्या कलागुणांचे आणि त्याला मिळालेल्या यशाचे मुंबईत सर्वत्र कौतुक केलं जात आहे

# निफाड जवळ कंटेनरच्या धडकेत आई आणि चिमुकल्याचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी / राहुल कुलकर्णी**
निफाड शुक्रवारी रात्रीच्या सुमारास नाशिक छत्रपती संभाजीनगर रोडवर नाशिककडून निफाडकडे येणाऱ्या मोटारसायकलला पाठीमागून येणाऱ्या भरधाव कंटेनरने धडक दिल्याने मोटरसायकलवरील पाठीमागे बसलेल्या मातेसह ३ वर्ष वयाच्या लहान मुलाचा करुण अंत झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. याबाबत पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र बाविस्कर यांनी दिलेल्या माहितीनुसार नाशिक बाजूकडून हिरो होंडा मोटारसायकल क्रमांक एम एच १५ एच एल 0२४७ ने शिवडी, तालुका निफाड येथील अनिल विश्वनाथ आहेर हे पत्नी ज्योती आणि लहान मुलगा वेदांश (वय ३ ) यांच्यासह शिवडी येथे येत असताना निफाडच्या अलीकडे असलेल्या जळगाव फाटा येथे येथे रात्री ८ वाजेच्या सुमारास पाठीमागून येणाऱ्या कंटेनर क्रमांक एम एच २० जी झेड २३३४ ने मोटारसायकलला पाठीमागून जोराची ठोस दिल्याने पाठीमागे बसलेले ज्योती आणि वेदांश हे जागेवर मृत झाले.या घटनेने शिवडी गावावर शोककळा पसरली होती.




आहेर कुटुंबाची परिस्थिती साधारण असून विश्वनाथ आहेर पीक अप वाहन चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात.

शोकाकुल वातावरणात आई व मुलाचा अंत्यविधी करण्यात आला. त्याच्या पश्यात पती, एक मुलगा (5),लहान भाऊ, जाव, पुतणी, सासू, सासरे असा परिवार आहे. निफाड पोलिसांनी कंटेनर चालकाला ताब्यात घेतले असून त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे, पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास राजेंद्र बाविस्कर व पोलीस करत आहे.

# वाहिरा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला प्रथम क्रमांकाचे ३ लाखाचे बक्षीस

## लोक सहभागातून वाहिरा शाळेचा झाला कायापालट...

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**
**बाळासाहेब रकटाटे :** तालुक्यातील वाहिरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अंतर्गत तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. आपल्या भौतिकेसोबतच, गुणवत्तेमधील परंपरा कायम ठेवत शाळेने शासनाकडून या पुरस्कारातंर्गत तीन लाख रुपयांचे बक्षीस मिळविले आहे.आष्टी तालुक्यातील दुर्गम व जिल्हा सरहद्दीवरती वाहिरा गाव वसलेले आहे. गावामध्ये सध्या जिल्हा परिषदेची १ ली ते ८ वी पर्यंतची वर्ग असलेली ही शाळा आहे. वाहिरा गावासोबतच घोंगडेवाडी, बोडखा, पिंपळगाव दाणी, मेहकरी, सोलापूरवाडी, पारोडी या गावातील विद्यार्थी या शाळेमध्ये प्रवेशित आहेत. सध्या या शाळेचा पट १६८ असून ३ पदवीधर शिक्षक व ४ सहशिक्षक कार्यरत आहेत. शासनाच्या चुकीच्या संचमान्यता धोरणामुळे मुबलक पट असतानाही या शाळेला आणखीही मुख्याध्यापक पद मिळाले नाही. या शाळेमध्ये शासनाद्वारे राबविण्यात येणारे विविध उपक्रम, ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा, राष्ट्रीय




शिष्यवृत्ती परीक्षा एन.एम. एम.एस, अशा विविध स्पर्धा परीक्षा मध्ये कायम गुणांकन मिळवत आलेली आहे. यासोबतच परसबाग, खेळांचे मैदान, गांडुळ खत उपक्रम, विविध क्रिडा स्पर्धा, निबंध, वक्तृत्व, भाषण स्पर्धा आदी अनेक सहशालेय उपक्रम घेतले जातात. वाहिरा ग्रामस्थांचा उत्तम सहभाग व सहकार्य सातत्याने लाभत असल्याने, शिक्षकांना दैनंदिन काम करणे आणखी सोयीचे होत आहे. यातुनच शाळेला आजवर जिल्हा, राज्य स्तरावरील ९ पुरस्कार मिळाले आहेत. जिल्हा परिषद बीड द्वारा घेण्यात आलेल्या स्पर्धेत या शाळेच्या विद्यार्थ्यांची इस्रो सहलीसाठी निवड झालेली आहे. मागील वर्षी परसबाग स्पर्धेमध्ये देखील शाळेला पहिला क्रमांकाचे बक्षीस मिळालेले आहे.

शाळेची भौतिक वातावरण आणखी चांगले व्हावेत यासाठी ग्रामपंचायत व वाहिरा ग्रामस्थ यांनी स्वतः पैसे खर्चून सर्व शाळेची रंगरंगोटी केली आहे. मागील अनेक वर्षांपासून यात्रेतील ईतर उपक्रम रद्द करून यात्रेमध्ये शाळेचा वार्षिक स्नेह संमेलन आयोजित केला जातो. या शैक्षणिक वर्षात झालेल्या वार्षिक स्नेह संमेलन कार्यक्रमाला उस्फुर्त प्रतिसाद देत १ लाख ८३ हजार रूपये लोकसहभाग शाळेला मिळाला आहे. वाहिरा ग्रामस्थांचा सातत्यपूर्ण सहकार्य आणि सहभाग मिळत असल्यानेच शाळेची पाऊल पुढं पडत असून, ग्रामीण दुर्गम भागातील ही शाळा जिल्ह्यामध्ये अग्रेसर होत असल्याची भावना येथील शिक्षक बिभीषण कवडे, सत्यवान लगड, शिवाजी खुडे, ज्ञानेश्वर गव्हाणे, सतीश काळे, अकील मोमीन, संतोष शेळके यांनी व्यक्त केली आहे. शिक्षक-ग्रामस्थ यांच्या एकीमुळे शाळेचा वाढता आलेख असल्याने ग्रामस्थानी शिक्षकांचे कौतुक केले आहे. हा पुरस्कार मिळाला असल्याने विविध स्तरांतून शिक्षक व ग्रामस्थांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# इर्टिका कारचा व मालवाहू गाडीचा भीषण अपघात! ३ ठार ६ जखमी

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी / राहुल कुलकर्णी**
नांदगाव तालुक्यातील कासारी येथून सोहळा आटोपून परतणाऱ्या इर्टीका कारला नांदगाव तालुक्यात अपघात झाल्याने कारमधील जळगाव तालुका निफाड येथील तिघे तरुण मृत्युमुखी पडले आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, जळगाव तालुका निफाड येथील शरद गंगाधर कराड यांच्या सुरज या मोठ्या मुलाचे लग्न शुक्रवारी दुपारी नांदगाव तालुक्यातील कासारी येथे होते या लग्नासाठी जळगाव येथून वऱ्हाड गेलेले होते विवाह आटोपून सायंकाळी इर्टीका गाडीने नवऱ्या मुलाच्या लहान भावासह जळगाव येथील ७ ते ८ तरुण नांदगाव कासारी मार्गाने निफाडकडे परतत असतांना अपघात झाला. या अपघातामध्ये निलेश शरद कराड ,तुषार शरद कराड अक्षय दौलतराव सोनवणे या तिघांचा मृत्यू झाला हे तिघेही जळगाव येथेच राहत होते.मृत तरुण तुषार कराड सिव्हिल इंजिनिअर होता तो कॉन्ट्रॅक्ट घ्यायचा, निलेश कराड हा इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर होता अक्षय सोनवणे हा निफाड येथील एका कांदा व्यापाऱ्याकडे दुकानाचे काम पाहत होता.यातील अक्षय सोनवणे हा मामाकडेच जळगावी राहत होता तिघेही तरुण कुटुंबातील कमावते होते,तिघेही अविवाहित होते.



# कोल्हापूर येथे 14 वी राष्ट्रीय सब ज्युनियर व ज्युनिअर क्लासिक (पुरुष व महिला) पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर** : महाराष्ट्र स्टेट पॉवरलिफ्टिंग असोसिएशन व कोल्हापूर जिल्हा पॉवरलिफ्टिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक-२० ते २५ मे २०२५ या कालावधीमध्ये राष्ट्रीय सब ज्युनियर व ज्युनिअर

क्लासिक पुरुष व महिला राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा-२०२५ कोल्हापूर येथे होणार सदर स्पर्धा राजमाता जिजाऊ दीक्षांत हॉल. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या ठिकाणी होणार आहे. ही स्पर्धा महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन चे सचिव शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त संजय सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे

या स्पर्धेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी कोल्हापूर जिल्हा पॉवरलिफ्टिंग चे सचिव डॉ. प्रशांत पाटील आणि त्यांचे सहकारी प्रा. विजय वडगावकर यांचेकडे असून या स्पर्धेसाठी भारतातून नामवंत खेळाडू 26 राज्यातून ३५२ पुरुष खेळाडू व २५६ महिला खेळाडू यांनी सहभाग नोंदविला आहे. त्याचबरोबर ४० आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय नामवंत या स्पर्धेस हजर राहणार आहेत. तसेच आपल्यामहाराष्ट्रातील नामवंत पंच, पदाधिकारी सुद्धा हजर राहणार आहेत. यापूर्वी औरंगाबाद येथे राष्ट्रीय बेंचप्रेस स्पर्धा जानेवारी 2023 मध्ये आयोजित करण्यात आलेली होती.कोल्हापूरच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी ज्यांना आर्थिक मदत करावयाची आहे तर त्यांनी श्री सूर्यकांत गर्दे, खजिनदार महाराष्ट्र पॉवरलिफ्टिंग( 9869736711) यांच्याशी संपर्क साधावा असेसंजय सरदेसाई. सरचिटणीस, महाराष्ट्र पॉवरलिफ्टिंग असोसिएशन कळविले आहे .

# उभ्या ट्रेलरला डंपरची धडक ; चालक गंभीर जखमी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल जवळील टी पॉईंटच्या ओव्हर ब्रीजवर पळस्पेकडॅन् मुंबईकडे जाणाऱ्या रस्त्यावर उभ्या करून ठेवलेल्या ट्रेलरला पाठीमागून आलेल्या डंपरने धडक दिल्याने झालेल्या अपघातात डंपर चालक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.ट्रेलर क्र.एमएच-01-ईएम-4917 वरील चालक जावेद अली साजात अली (40) याने रस्त्याच्या डाव्या बाजूला हयगयीने अविचाराने सार्वजनिक रस्त्यावर धोकादायक स्थितीत ट्रेलर उभा करून ठेवला असताना पाठीमागून आलेल्या डंपर नं.एमएच-47-बीवाय-1649 वरील चालक महेश महातो याची धडक सदर ट्रेलरला बसल्याने या अपघातात चालक महेश महातो हा गंभीर जखमी झाला आहे. या अपघाताची माहिती मिळताच पनवेल शहर पोलिसांचे पथक घटनास्थळी रवाना झाले. परंतु उभ्या ट्रेलरच्या आतमध्ये डंपर घुसल्याने चालक महेश महातो हा अडकला होता व तो गंभीररित्या जखमी झाला होता. तेथील पोलिसांनी त्वरित पनवेल अग्नीशमन दलाच्या पथकाला घटनास्थळी पाचारण केले व अथक प्रयत्नाने महेश महातोला बाहेर काढून त्याला उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# राज्यस्तरीय ऑफलाइन सामान्य ज्ञान स्पर्धा 18 मे रोजी अड्याळ व पहेला येथे आयोजित

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे / भंडारा** : प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस व दैनिक माझा विदर्भ विभागीय संपादक पत्रकार संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेली राज्यस्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा उद्या दिनांक 18 मे 2025 ला रोज रविवारी सकाळी 8 ते 9 वाजेपर्यंत ज्या विद्यार्थ्यांनी सनराइज कॉम्पुटर पहेला चे संचालक विलास बांडेबुचे यांच्याकडे नावाची नोंदणी केली त्या विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षा पहेला येथील जिल्हा परिषद शाळेत ग्रामपंचायत च्या बाजूला लागून असलेल्या शाळेत घेण्यात येईल.त्याचप्रमाणे अड्याळ येथील ओ एस एस कॉम्प्युटरचे संचालक संजय वंजारी यांच्याकडे ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे त्यांची परीक्षा हरडे कॉम्प्लेक्स पोलीस कॅम्प बस स्टॉप मेन रोड अड्याळ येथे घेण्यात येईल. करिता सर्व विद्यार्थ्यांनी दिलेल्या केंद्रावर ठराविक वेळेवर ठीक 7.45 वाजता परीक्षा केंद्रावर पोहोचावे असे आवाहन आयोजक व संयोजक यांनी केलेले आहे.

# पाटोदा दुय्यम निबंधक श्रेणी-१ अधिकारी पाटील यांच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करून तात्काळ कारवाई करा - गोरख झेंड

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा येथील दुय्यम निबंधक श्रेणी-१कार्यालयात कार्यरत असलेले अधिकारी पाटील हे अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असून, त्यांनी आपल्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणावर बोगस व्यवहार, दलालांमार्फत दस्त नोंदणी आणि नागरिकांकडून अनधिकृत पैसे उकळल्याचे गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते गोरख झेंड यांनी केले आहेत. या संदर्भात गोरख झेंड यांनी जिल्हाधिकारी बीड व उपविभागीय अधिकारी पाटोदा यांच्या कडे लेखी तक्रार दाखल केली असून, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून अधिकारी पाटील यांची तात्काळ बदली करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. गोरख झेंड म्हणाले,"दस्त नोंदणीच्या नावाखाली नागरिकांची अक्षरशः लूट सुरू आहे. कार्यालयात दलालांचा मुक्त वावर असून, थेट दस्त नोंदवून घेणे शक्य होत नाही. सामान्य नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. "ते पुढे म्हणाले, "गेल्या पाच वर्षांतील सर्व जमिनी व्यवहार, नामांतरे व फेरफार नोंदींची स्वतंत्र समिती मार्फत चौकशी झाली पाहिजे. अधिकारी पाटील यांच्या कार्यपद्धतीमुळे प्रशासनाची प्रतिमा मलिन होत आहे. "स्थानिक नागरिकांतही या प्रकरणामुळे तीव्र नाराजी असून, लवकरात लवकर कारवाई न झाल्यास जनआंदोलन छेडण्याचा इशारा ही गोरख झेंड यांनी दिला आहे.




# पनवेलमध्ये 'आंबा महोत्सव'ची धूम; तीन दिवसीय आंबा महोत्सवाला सुरुवात

## सांस्कृतिक, मनोरंजनात्मक कार्यक्रमासह कोकणमेव्याची पर्वणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)** : पनवेल शहरात प्रथमच तीन दिवस 'आंबा महोत्सव' आयोजित करण्यात आला असून, या महोत्सवाची सुरुवात मोठ्या उत्साहात झाली आहे. लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून भारतीय जनता पार्टी पनवेल शहरच्यावतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.शहरातील डॉ. पटवर्धन हॉस्पिटल समोरील गुजराती शाळेच्या मैदानावर सुरू झालेल्या या महोत्सवाचे उद्घाटन प्रमुख मान्यवर शकुंतलाताई ठाकूर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात झाले.या महोत्सवाच्या निमित्ताने महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते श्री.परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. उदघाटनाच्या दिवशी महिलांसाठी 'खेळ खेळूया साऱ्याजणी चला जिंकूया अस्सल पैठणी' हा विशेष कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने यावेळी महिलांनी मनमुराद आनंद लुटला. यासोबतच महोत्सवाच्या दुसऱ्या



दिवशी म्हणजेच शनिवारी 'अभंग रिपोस्ट' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला तसेच रविवार दिनांक १८ मे रोजी संगीत, नृत्य व कलेचा संगम असलेला'वारसा संस्कृतीचा' हा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम सादर आहेत. तसेच, कोकणचा अस्सल स्वाद अनुभवण्यासाठी कोकण मेवाही उपलब्ध करून देण्यात आला आहे. दरम्यान या महोत्सवाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे,




केला जाणार आहे. या महोत्सवात खवय्यांसाठी विविध प्रकारच्या आंब्यांचे स्टॉल्स उभारण्यात आले भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी सदिच्छा भेट देत महोत्सवाचे कौतुक केले. या महोत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून वर्षा प्रशांत ठाकूर,अर्चना परेश ठाकूर, ममता प्रीतम म्हात्रे, माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक राजू सोनी, प्रभाकर बहिरा, सुनिल बहिरा, संजय भगत, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा राजेश्री वावेकर, माजी नगरसेविका सुशीला घरत, हेमलता म्हात्रे, प्रीती जॉर्ज-म्हात्रे, सारिका भगत, डॉ. सुरेखा मोहोकर, पुष्पलता मढवी, नीता माळी, रेणुका मोहोकर, स्वाती कोळी, संजीवनी खिल्लारे, कोमल कोळी, अंजली काणे, सपना पाटील, प्रभाग अध्यक्ष पवन सोनी, यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. आयोजक माजी नगरसेविका रुचिता लोंढे, पनवेल मंडल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, अमित ओझे, केदार भगत, रुपेश नागवेकर, अभिषेक पटवर्धन यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

# पिंपळा येथील यश संतोष चौधरी यांनी प्रथम क्रमांक पटकावून दहावीच्या परीक्षेत मारली बाजी..!

## गौरव मोतीराम कालापाड यांनी दुसरा तर पल्लवी गणेश गीते हिने तिसरा क्रमांक पटकावला

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा/ प्रतिनिधी**
**करण धोंगडे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळचा निकाल नुकताच जाहीर झाला.त्यानुसार श्री.पांडुरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळा या शाळेने उत्कृष्ट निकालाची परंपरा याही वर्षी कायम राखली आहे.शैक्षणिक वर्ष 2024/25 प्रविष्ट झालेल्या सर्वच विद्यार्थ्यांनी गुण घेऊन घवघवीत यश प्राप्त केले.यामध्ये विशेषतः पहिल्या क्रमांकावर पिंपळा येथील यश संतोष चौधरी यांनी 94.60% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे.तर गौरव मोतीराम कालापाड 91.40% घेऊन दुसरा क्रमांकावर मजल मारली आहे. पल्लवी गणेश गीते 89.80% घेऊन तिसरा क्रमांक घेऊन गुण प्राप्त करून शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे. परीक्षेत प्रविष्ट झालेले व उत्तमरीत्या यश प्राप्त करणारे सर्वच विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय त्यांचे स्वतःचे कठीण परिश्रम व शाळेचे मुख्याध्यापक आर.एन देशमुख(बापू),शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचारी तथा आई-वडील यांना देतात यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे लाडके संस्थापक अध्यक्ष आदरणीय अनिल भाऊ गवळी तथा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी पुष्पगुच्छ देऊन यशस्वी विद्यार्थी यांचे स्वागत करून कौतुक व गुणगौरव केला.





**या तिनही चमुणी आपल्या नावाबरोबर श्री.पांडुरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळा या शाळेच्या नावासहित आपल्या गावाचे नाव केले रोशन.या तिनही होतकरू विद्यार्थ्यांन बरोबर सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पिंपळा येथील ग्रामस्थांनी कौतुक करून पुढील वाटचालीसाठी दिल्या शुभेच्छा..**

# दहावीचे वर्ष हे विद्यार्थी जीवनाला दिशा देणारे वर्ष - शिक्षक आमदार किरणराव सरनाईक

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका (प्रतिनिधी)**
**रणजितसिह ठाकुर** : दहावीचे वर्ष हे विद्यार्थी जीवनाला दिशा देणारे वर्ष असून हे वर्षच विद्यार्थ्यांचे भविष्य कोणत्या दिशेने जाणार हे ठरविण्यासाठी उपयुक्त ठरते असे प्रतिपादन स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे वर्ग दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलत असताना अमरावती विभागाचे शिक्षक आमदार ॲड किरणराव सरनाईक यांनी केले.श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे दिनांक 28 मे 2024 रोजी इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये गुणवत्ता प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिम चे अध्यक्ष तथा अमरावती विभागाचे शिक्षक आमदार ॲड किरणराव मुख्याध्यापक अनिस खान हे उपस्थित होते.



सरनाईक हे होते तर प्रमुख उपस्थितांमध्ये स्थानिक शाळा समिती संचालक पंजाबराव देशमुख, जितेंद्रकुमार दलाल, संजयकुमार जिरवणकर,कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संजयराव देशमुख, उपमुख्याध्यापक संजयराव नरवाडे, पर्यवेक्षक गजाननराव भिसडे, सुधाकरराव देशमुख, श्री शिवाजी प्राथमिक मराठी चे मुख्याध्यापक सचिन देशमुख,उर्दू प्राथमिक चे

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्येची आराध्य देवता माता सरस्वती, छत्रपती शिवाजी महाराज व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आद्य संस्थापक स्व. ॲड आप्पासाहेब सरनाईक यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचा शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह शाळेच्या वतीने भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी संचालक पंजाबराव देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तसेच पालकांमधून श्री अकिल घनकर यांनी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय स्थानावरून पुढे बोलताना ॲड.किरणराव सरनाईक म्हणाले की, विद्यार्थ्यांसाठी दहावीचे वर्ष अत्यंत महत्त्वाचे असते हे वर्ष त्यांच्या पुढील शैक्षणिक जीवनाला वळण देणारे वर्ष असते. आजच्या काळामध्ये गुणवत्ता जरी वाढली असली तरी स्पर्धाही तितकीच वाढलेली आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी न डगमगता आत्मविश्वास व मेहनत करण्याची जिद्द दाखविल्यास त्यांना इच्छित ध्येय गाठण्यास मदत होते, तसेच ते म्हणाले की दरवर्षीच शाळेचा निकाल चांगला लागतो मात्र यावर्षी 90% व त्याहून अधिक गुण प्राप्त करणारे 15 विद्यार्थी असल्यामुळे या सर्व विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शिक्षकांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राचार्यांची यामध्ये फार मोलाची भूमिका आहे. शाळेचा उत्कृष्ट निकाल लागल्यामुळे प्राचार्य संजयराव देशमुख यांचे अध्यक्ष ॲड.किरणराव सरनाईक यांनी कौतुक करताना आता आपली जबाबदारी आणखी वाढली आहे याची आपण दक्षता घ्यावी असेही यावेळी सांगितले व ही परंपरा अशीच कायम ठेवण्याची त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त केली.यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांसह शाळेतील सर्व विषय शिक्षकांना दिले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य संजयराव देशमुख यांनी केले तर संचालन व आभार प्रदर्शन प्रा.विजय देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




# सणसर हायस्कूल दहावीचा 91.66 टक्के निकाल जाहीर कु.श्वेता निंबाळकर हिने पटकावला प्रथम क्रमांक

**दैनिक युवक आधार**
**सणसर / विकास क्षत्रिय इंदापूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झालाअसून श्री छत्रपती शिक्षण संस्था संचालित श्री छत्रपती हायस्कूल सणसर मधील १० वीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.शाळेचा निकाल 91.66 टक्के लागला.त्यात इयत्ता दहावी मधील कु.श्वेता अभिजित निंबाळकर हिने 86.20 टक्के गुणांसह शाळेत प्रथम क्रमांक मिळवला. द्वितीय क्रमांक दीपेश लक्ष्मण काळे,तृतीय क्रमांक कु.अंकिता अशोक निंबाळकर यांनी अव्वल स्थान मिळवले.याबद्दल संस्थेचे अध्यक्ष,सचिव सर्व संचालक सणसर ग्रामपंचायतचे सरपंच उपसरपंच,सर्व सदस्य ग्रामसेवक तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. सर्जे एस डी सर व सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# वाशिम तहसील ला 30 जून च्या आधी हयात प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला सादर करा,अन्यथा संजय गांधी श्रावण बाळ योजना अनुदान थांबणार

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील** : विशेष सहाय्य योजनेतील संजय गांधी योजना श्रावणबाळ योजना व तत्सम योजनेतील लाभार्थी यांना दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर उत्पन्नाचा दाखला व हयात प्रमाणपत्र सादर करण्याचे शासनाचे निर्देश आहेत. त्यानुसार वाशिम तालुक्यातील सर्व संजय गांधी योजना श्रावण बाळ योजना व तत्सम योजनेतील परिकथा व दिव्यांग मानधन लाभार्थ्यांनी 30 जून 2025. अखेर पर्यंत हयात प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला तहसील कार्यालय वाशिम येथील संजय गांधी योजना.शाखेत सादर करावा. 30 जून 2025 अखेरपर्यंत हयात प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला सादर न केल्यास आपले वरील योजनेचे अनुदान बंद होऊ शकते तरी वरील योजनेचे लाभार्थी यांना आवाहन करण्यात येते की माहे 30 जून 2025 पर्यंत ह्याच प्रमाणपत्र व उत्पन्न दाखला तहसील कार्यालय वाशिम येथील संजय गांधी योजना शाखेत सादर करावे असे आवाहन, वाशिम तहसीलदार निलेश पळसकर यांनी कळविले आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना

# अंभोरा येथील पंडित बंधूंना राज्यस्तरीय विश्वकर्मा कलाभूषण पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**बाळासाहेब रकटाटे**
**आष्टी प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील अंभोरा येथे गेल्या कित्येक वर्षापासून कृष्णशिला या दगडापासून अत्यंत सुंदर अशा देवतांच्या मूर्ती घडवण्याचं काम बाळासाहेब पंडित व भीमराव पंडित हे दोन बंधू करत आहेत. या त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय विश्वकर्मा कला पुरस्कार जाहीर झाला असून तो पुरस्कार 18 मे रोजी अक्कलकोट या ठिकाणी प्रदान करण्यात येत आहे. चंद्रकांत दादा वेदपाठक यांनी पत्राद्वारे त्यांना निवड झाल्याचे कळवले आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.याबाबत सविस्तर माहिती असे की बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) अक्कलकोट सोनार हक्क परिषद जिल्हा सोलापूर स्वराज्य पोलीस मित्र पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटना तालुका अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमानाने राज्यस्तरीय सुवर्ण रत्न पुरस्कार दिला जातो. यावर्षीच्या या पुरस्कारासाठी अंभोरा येथील बाळासाहेब पंडित व भीमराव पंडित या दोन शिल्पकार बंधूंची निवड झाली आहे. पत्राद्वारे चंद्रकांत दादा वेदपाठक कार्यक्रमाचे संयोजक यांनी त्यांना कळवले आहे. मागील 40 वर्षापासून हे पंडीत बंधू कुटुंबातील मुर्तीकार मुर्ती घडवितात. सुमारे १२४० मुर्ती (विविध देव-देवता, व्यक्तींच्या त्यांनी घडविल्या आहेत. .अंभोरा येथे सन १९८२ मध्ये येतील अंबेश्वर मंदीर कामातील मुर्ती कामानिमित्त हे कर्नाटकी कुटुंब येथे आले. आज हे कुटुंब येथेच स्थाईक झालेले आहे. नगर येथे असताना काही दिवस ओतीव धातुंच्या छोट्या मुर्ती बनविण्याचे काम त्यांनी केले. अंभोरा येथे आल्यापासुन





कर्नाटकातील बागलकोट येथून आणल्या जाणाऱ्या "कृष्णशिला" दगडापासुन ते देवदेवतांच्या, थोरपुरूषांच्या, संताच्या, मुर्ती, पुतळे घडवितात. १ इंच उंचीपासुन ते ७ फुट उंचीपर्यंतच्या मुर्ती त्यांनी तयार केल्या आहेत. कृष्णशीळेवर एक मुर्ती तयार करण्यास लागणारा कालावधी हा त्या मुर्तीच्या आकारावर अवलंबून असतो. हा पाषाण गर्द काळसर असल्याने रंग न देतासुध्दा मुर्ती सुबक दिसते. पण मूर्ती बनविल्यानंतर त्यांनारंग देण्याचे कामही पंडीत करतात. पंडीत यांनी तयार बाळासाहेब केलेल्या मूर्ती खरोखर एखाद्या छायाचित्राप्रमाणे दिसतात. दोन वर्षाला ३ ट्रक दगड या मुर्तीकारांना लागते. एक ट्रक दगड ३० ते ४० हजार रूपयाला मिळतो. दगडाचा आकार मोठा असल्यास दर वेगळा असल्याचे . बाळासाहेब पंडीत यांनी सांगीतले. मूर्तीच्या 'आकारावरून दगडाची निवड केली जाते. समोरील छायाचित्र पाहून मूर्तीला आकार देण्याचे काम करतात. सुरूवातीला बाह्य आकार देवून कौशल्याने दगडाला "देवपण" आणले जाते. मूर्तीना आकार देताना एखादा ठोका चुकला तर मेहनत, वेळ व दगड कायमचा वाया जातो. त्यामुळे मुर्ती घढविणे हे सोन्याहून अधिक अनमोल आहे. या मूर्तीकारांना अंभोराकरांचे चांगले सहकार्य आहे. छन्नी, हातोडा, काणस, पटाशी, पॉलिश पेपर, रंग आदी साहित्य वापरले जाते. पंडीत मुर्तीकारांना बीड जिल्हाउद्योग केंद्रारचा १९८८ साली प्रथम क्रमांकाचा सन्मान मिळालेला आहे. पंडीतानी बनविलेल्या छत्रपती अ.भा. हस्तकला पुतळयास ३४ व्या अ.भा. हस्तकला सप्ताहात राज्यस्तरीय व्दितीय क्रमांक मिळाला आहे. या मूर्तीकरांना सुरवतीच्या काळात स्मशानात मुर्ती घडविण्याचे काम केले होते. आज त्यांनी येथे गावांत घर बांधले. घरासमोरील पटांगणात ते मूर्ती घडवितात. घडविल्या मुर्तीची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, गणपती मूर्ती, महेशाची पिंड, संताच्या मूर्ती, विविध देवदेवतांच्या मूर्ती, मोहटा देवीची मूर्ती,, , नंदी, हनुमान मूर्ती आहेत. पंडीत यांना जिल्हा, राज्य स्तरीय शिल्पकार कृतीने पुरस्कार मिळालेले आहेत. अंभोरा गावाची मूर्तीकार पंडीत बंधूनी एक नवीनच ओळख निर्माण करून आहे. अ.नगर आकाशवाणी केंद्रातून या मूर्तीकार पंडीत जी मुलाखत प्रसारीत झालेली आहे.

# खारघरमधील विविध विकासकामांचे भूमिपूजन



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :**खारघरमधील विविध गृहसंकुलांमधील अंतर्गत रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामाचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. यावेळी त्यांनी विकासकामांचा प्रवाह अविरतपणे सुरू राहील, अशी ग्वाही दिली.पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत आणि पनवेल महापालिकेमार्फत खारघरमधील अनेक रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात येणार आहे. यामध्ये वास्तु विहार केएच 1 आणि केएच 2, पारिजात केएच 2, घरकुल ए विंग महालक्ष्मी सोसायटी, घरकुल बी विंग कुंजविहार, स्पॅगेटी इएफ प्रियदर्शनी सोसायटी, स्पेगेटी एचआय पारिजात सोसायटी, स्पेगेटी जेकेएलएम सोसायटी तसेच वास्तुविहार सेक्टर १६ येथील आरे डेरीपासून साई गणेश मंदिरापर्यंतचा रस्ता, केएच /२ मागील गेटपासून केपीसी स्कूलपर्यंतचा रस्ता आणि सेक्टर 17 मधील दामोदर प्रिया बिल्डिंगपासून सेलिब्रेशन सोसायटीच्या मागील रस्त्याचा समावेश आहे.माजी नगरसेविका संजना समीर कदम यांच्या पाठपुराव्यामुळे या कामांना मंजुरी मिळाली आहे. याप्रसंगी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भारतीय जनता पार्टी आणि पनवेल महानगरपालिका नागरिकांना अधिक सुविधा देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी भारतीय जनता पार्टीची ताकद नागरिकांना सुविधा देण्यासाठी उपयोगात येत असून, नागरिकांच्या अपेक्षित असलेली सर्व कामे लवकरच मार्गी लागतील, असा विश्वास व्यक्त केला.या भूमिपूजन कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक गणेश कडू, नरेश ठाकूर, अभिमन्यू पाटील, निलेश बाविस्कर, माजी नगरसेविका संजना समीर कदम, युवा नेते समीर कदम, रायगड जिल्हा सचिव अजिंक्य नवघरे, खारघर मंडल उपाध्यक्ष किरण पाटील, अमर उपाध्याय, संदीप माघाडे, अजित अडसुळे, कल्पेश तोडेकर, संतोष शर्मा, प्रभाग अध्यक्ष युवा मोर्चा सुशांत पाटोळे, प्रथमेश मोरे, सर्जेराव मेंगाने, प्रणय मोरे, विश्वनाथ इंडी, रावसाहेब आभाळे, मुकेश गर्ग, राजू आचलकर, महेश हिनुकले, अमित बोदाई, संजय शर्मा, अनिल बोरे, स्नेहल बोधाई, सुनील येवले, सोनू सूर्यवंशी, साहिल कोळी, महेंद्र कांबळे, सुधीर सावंत, आशा मोरे, प्रकाश ओव्हाळ, तसेच सोसायट्यांचे अध्यक्ष, सचिव आणि इतर पदाधिकारी तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी केक कापून परेश ठाकूर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

# रायगडजिल्हा नागरी संरक्षण दल उरणच्या वतीने उरण मध्ये “ऑपरेशन अभ्यास” मॉक ड्रिल जोरात

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**
**प्रदीप पाटील** : काश्मीरमधील पहलगांम मध्ये दि.22 मे रोजी पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्यानंतर देशाचे पन्तप्रधान नरेंद्र मोदीजीनी “ऑपरेशन सिंदूर” च्या माध्यमांतून पाकीस्तानला प्रत्युत्तर दिले भारत पाक सीमेवरती अतिरेक्यांचे अड्डे उद्ध्वंस्त करताना भरतात केंद्रीय गृह विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपत्कालीन परिस्थितींसाठी सज्जता तपासण्याकरिता “ऑपरेशन अभ्यास” या मॉक ड्रिलचे आयोजन देशभरात करण्यात आले. यामध्ये महत्वाचे आणि अति सवेदना शील म्हणून हे मॉक ड्रिल रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात करण्यात आले असून तालुक्यांतील अनेक प्रकल्पामधून या मॉक ड्रिलचे आयोजन रायगड जिल्हाधिकारी तथा नागरी संरक्षण दलाचे नियंत्रक किसन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरी संरक्षण दलाच्या उरण येथील मुख्यालयातून करण्यात आले आहे.

प्रथम मॉक ड्रिलचे आयोजन उरण येथील एन.आय .हायस्कूल येथे बुधवार दि. 7 मे 2025 नागरी संरक्षण दलाच्या वतीने करण्यात आले. यावेळी 4:00 वाजता नागरी संरक्षण दलाच्या वतीने उरण शहरा सह तहसिल कार्यालय, उरण, ONGC कॉलनी,ग्रुप ग्रामपंचायत, चाणजे, GTPS कंपनी, बोकडविरा, बारमर लॉरी, भेंडखळ, ऑल कार्गो कंपनी, कोप्रोली, बल्क गेट कंपनी, मोरा या दरम्यान एन.आय. स्कूल, पंचायत समिती,आदी सात ठिकाणी बसविण्यात आलेले सायरन दुपारी 4:00 वाजता सतर्कतेचा इशारा म्हणून वाजवीण्यात आले.आणि पाठोपाठ आपत्कालीन व्यवस्थेनुसार सिडको अग्निशमन दलाच्या गाडी बरोबरच मॉक ड्रिल मध्ये महसूल प्रशासन ,नागरी संरक्षण दल,उरण नगर परिषद,पोलीस प्रशासन उरण, ,आरोग्य विभाग ,ग्रामविकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आदीं अस्थापनानी सहभाग घेतला होता.

या वेळी खासदार धैर्यशील पाटील , उरण चे आमदार महेश बालदी ,पनवेल चे आमदार प्रशांत ठाकूर ,उपविभागीय अधिकारी पवन चांडक ,उरण तहसिलदार



डॉ .उद्धव कदम ,सहाय्यक पोलीसआयुक्त ( पोर्ट विभाग )नवीमुंबई विशाल नेहूल , जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ



पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ.,उरण नगरपरिषद मुख्याधिकारी समीर जाधव ,उरण नगरपरिषद माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे माजी नगरसेवक रवी भोईर , ,माजी नगरसेवक कौशिक शाह, माजी नगरसेवक नवीन राजपाल,रायगडचे नोडल अफिसर एम .के .म्हात्रे (आपदा) ,उरणचे सहाय्यक उपनियंत्रक शशिकांत शिरसाट सर्व विभागाचे आपदा मित्र अधिकारी वर्ग उपस्थित होते.सुमारे 1 तसापेक्षा अधिक काळ हे मॉक ड्रिलसुरु होते.महाराष्ट्रात एकूण 16 ठिकाणी मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले होते त्या पैकी उरण तालुका हा अतिसवेदनाशील तालुका असल्याने रायगड सह सर्व महाराष्ट्राचे लक्ष लागून या मॉक ड्रिलकडे लागून राहिले होते.

त्यानुसर हे मॉक ड्रिल अत्यंत शिस्तबद्ध,योजनाबद्धपार पडले परंतु मॉक ड्रिल हे सर्वानीच पाहणे आवश्यक असले तरी प्रत्यक्षात कोणत्याही गंभीर घटनेच्या वेळी अथवा बॉम्बस्पोटाच्या वेळी मोबाइलवर सेल्फी काढणे अथवा फोटोग्राफी करीत राहणे याला बंदी असावी(पत्रकार सडून)

दि.7 मे पासून सुरु करण्यात आलेले हे मॉक ड्रिलपुढे उरण तालुक्यांतील मोरा येथील ग्राँडव्हील कंपनी ( 9/5),भेंडखळ येथील बामर लॉरी(10/5),उरण ओएनजीसी प्रकल्प (11/5),बीपीसीएल प्रकल्प भेंडखळ (12/5),जेएनपीए परिसरमधील दीपक फ़ल्टिलायझर(12/5) येथे दुपारी 3:00 वाजता,उरण तहसीलदार कार्यालया मध्ये प्रत्यक्षीक व व्याख्यान,पंच्यातसमिती उरण कार्यालययेथे (14/5) अश्या प्रकारे आत्ता उरण तालुक्यांतील सर्व प्रकल्पामधून हे मॉक ड्रिल जोरात सुरु आहे. अजूनही पाकिस्ताने युद्धबंदीची घोषणा केल्या नंतरही काही तासातच पून्हा द्रोणने हल्ला सुरु केला त्यामुळे आजही युद्धाचा तणाव कायम असल्याने रायगड नागरी संरक्षणदलाचे मुख्यालय असलेल्या उरण येथील कार्यालयात 11 मे 2025 पासून गृहरक्षक (होमगार्ड) दलाचे 50 जवान तैनात करण्यात आलें आहेत. त्या पैकी 25 जवान हे सकाळच्या सत्रात काम पहातात व उवर्रीत 25 जवान हे रात्रीच्या सत्रात आपल्या कर्तव्यावर हजार

**26/11 रोजी मुंबई वर झालेल्या दहशदवदी हल्ल्याची पार्श्वभूमी लक्षात घेता उरणातील खाडी किनारे त्याचप्रमाणे मुंबईतील सी.एस.एम.टी.(बोरीबंदर) येथे ज्या पद्धतीने अतिरेक्यांनी हल्ला केला होता ही विसरण्याची चुकी उरण येथील प्रशासनांनी करू नये, उरण तालुक्यात.उरण सिटी. द्रोणागिरी (बोकडवीरा),न्हावा-शेवा (नवघर),आणि शेमटीखार ही चार रेल्वे स्थानके आहेत या ठिकाणी ही सायरन बसविणे आवश्यक आहे, त्याच बरोबरीने एखादे मॉक ड्रिलकोणत्याही रेल्वे स्थानकात आयोजित करण्यात यावे त्याच प्रमाणे उरण येथे भविष्यात अश्याप्रकारची आपत्तीनिर्माण झाल्यास सुसज्ज रुग्णालय असणे आवश्यक आहे याची लवकरात लवकर निर्मिती करावी अशी मागणी उरण मधील समाज सेवक सचिन डाउर यांनी केली आहे.**



असतात,या उपस्थित गृहरक्षक (होमगार्ड) दलाच्या जवानांनाप्रथम दिनी मार्गदर्शन करण्यासाठी नागरी संरक्षण दलाच्या रायगड जिल्ह्याच्या उरण स्थितत मुख्य कार्यालयात कार्यालयाचे प्रभारी उपनियंत्रक एल.जी. मालगावे उपस्थित होते.सुरु असणाऱ्या मॉक ड्रिलअंतर्गत नागरिकांना,प्रकल्पात. कार्यालयात काम करीत असणाऱ्या कर्मचार्यांना Air Strike/ बॉम्ब हल्ल्याची सूचना मिळणार,सर्व नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचण्यासाठीच्या सूचना दिल्या जाणार,नागरी संरक्षण दलाचे स्वयंसेवक,आपदा मित्र,वतैनात करण्यात आलेले गृहरक्षक दलाचे जवान धावाधाव, गडबड न करता नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचविण्याचे कामकरतील, संबंधित परिसरात शोध मोहीम घेवून जखमी, अडकलेल्या नागरिकांची तात्काळ सुटका करणे, त्यांना प्रथमोपचार करणे, ही कार्यवाही ते करतील.

यानुषंगाने सर्व यंत्रणांनी या मॉक ड्रिलला गांभीर्याने घ्यावे. केंद्रीय गृह विभागाने दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून यशस्वीरित्या ही मॉक ड्रिल पार पाडावी. मॉक ड्रिलच्या दरम्यान सूचना मिळाल्यानंतर सायरन वाजवून नागरिकांना धोक्याचा इशारा दिला जाईल.या दरम्यान नागरिकांनी घाबरू नये, अफवांवर विश्वास ठेवू नये, सेल्फी काढू नये आणि प्रशासनाकडून दिलेल्या सूचनांचे पालन करावे, हे मॉक ड्रिल केवळ पूर्वतयारीचा भाग असून अजून जरी कोणतीही खरी आपत्ती उद्भवलेली नाही, हे लक्षात घ्यावे, हे मॉक ड्रिल असले तरी देशात पाकिस्तान बाबत अजून काही संगता येत नसल्याने घटनेचे गांभीर्य जाणून उरण वासियांनी सहकार्य करावे हे असे आवाहन उरणचे



तहसिलदार डॉ.उद्धवकदम यांनी उरणच्या नागरिकांना केले आहे.



## शिवम चौसष्टे यांचे यश

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**



**शिरूर आनंतपाळ :** येरोळ ता,शिरूरआनंतपाळ येथील कु.शिवम बस्वराज चौसष्टे यांने इयत्ता दहावी बोर्ड परिक्षेत ९६ % गुण घेऊन येरोळ गावचे नाव शिरूरआनंतपाळ तालुक्यात उज्वल केले आहे.येथील किराणा व्यापारी बस्वराज व्यंबक चौसष्टे यांचा मुलगा कु.शिवम हा उदगीर येथील शामलाल हायस्कुल येथे शिक्षणासाठी होता. तो दहावी बोर्ड परिक्षेत ९६ टक्के मार्क घेऊन उत्तीर्ण झाला. त्याच्या या यशाबद्दल येरोळ येथील उपसरपंच सतिस सिंदाळकर, जलसंपदा विभागाचे विशेष अभियंता नागेश तोंडारे, हावगी दाडगे, शिवकुमार साकोळकर, शैलेश सिंदाळकर, मगेंश पाटील, गोविंद पोतदार, पत्रकार ओमप्रकाश तांबोळकर, शिवशंकर सुमठाणे, मु.अ,राज निचळे, प्राचार्य बालाजी महावरकर, रवि पाटील, चेअरमन अतुल पाटील गंभीरे, विश्वनाथ साकोळकर व गावातील शिक्षणप्रेमी नागरिकांने कु. शिवम याचे अभिनंदन केले आहे.

## 'राष्ट्रीय डेंग्यू दिन' निमित्त स्वच्छता कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार १६ मे रोजी 'राष्ट्रीय डेंग्यू दिन' साजरा करण्यात येत असून, यानिमित्ताने पनवेल महापालिकेच्यावतीने डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अमंलबजावणी करण्यासाठी आयुक्त श्री.मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आज आंबेडकर भवन येथे स्वच्छता विभागाच्या कर्मचाऱ्यांना वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने प्रशिक्षण देण्यात आले.उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार घेण्यात आलेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या नेतृत्वाखाली हे प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी साथरोग वैद्यकिय अधिकारी डॉ. आकाश ठसाळ, घनकचरा व स्वच्छता विभाग प्रमुख अनिल कोकरे, वैद्यकिय अधिकारी, स्वच्छता निरीक्षक संजय जाधव, आरोग्य पर्यवेक्षक प्रमोद गिरी उपस्थित होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत स्वच्छता कर्मचाऱ्यांना डास उत्पत्ती ठिकाणे कशी ओळखावी, ती नष्ट करण्याबाबत व पुन्हा तयार होऊ नयेत याची प्रेझेंटेशनच्या माध्यमातून माहिती देण्यात आली. तसेच बांधकाम क्षेत्राच्या ठिकाणी घेण्याविषयीची काळजी, धूर फवारणी, औषध फवारणी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याचबरोबर औषध फवारणीची पध्दत, घरांमधील सर्वे याबाबतही यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.केंद्र शासनाने यावर्षीच्या राष्ट्रीय डेंग्यू दिनासाठी "तपासा, स्वच्छ करा आणि झाकून ठेवा: डेंग्यूला हरविण्याचा उपाय हाच" हा संदेश दिला आहे. त्यानुसार शाळा, महाविद्यालये, भाजी मंडई अशा विविध ठिकाणी परिचारिकां व कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

डेंग्यू हा डासांमुळे होणारा आजार असून, त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नागरिकांनी स्वच्छता राखणे, पाणी साठू न देणे, घरातील व घराबाहेरील जागा स्वच्छ ठेवणे, पाणी साठवणाऱ्या वस्तूंना झाकून ठेवणे अशा उपाययोजना राबवण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. डेंग्यूवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांनी एकत्र येऊन दक्षता घेतल्यास या आजाराला आपण नक्कीच आळा घालू शकतो.




# परेश ठाकूर यांच्याकडून सामाजिक कार्यासह क्रीडा क्षेत्राची उंची वाढविण्याचे काम - प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण

## पनवेल फुटबॉल लीगच्या अनुषंगाने स्थानिक फुटबॉल पर्वाला सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांचे समाजातील प्रत्येक घटकाबरोबर चांगले नाते असून त्यांच्या पाठीशी युवा शक्ती आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री व भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी खारघर येथे केले. तसेच सामाजिक कार्यासह क्रीडा क्षेत्राची उंची वाढविण्याचेही काम त्यांनी केले असल्याचे अधोरेखित केले. महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते व युवा पिढीचे प्रेरणास्थान परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा खारघरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पनवेल फुटबॉल लीगला अर्थात स्थानिक फुटबॉल भव्य पर्वाला खारघरमध्ये शानदार सुरुवात झाली. या फुटबॉल लीगचे उदघाटन महाराष्ट्र प्रदेश भाजपचे कार्यकारी अध्यक्ष आणि राज्याचे माजी मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यावेळी उदघाटक म्हणून मार्गदर्शन करताना बोलत होते.यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, हरेश केणी, गणेश कडू, पापा पटेल, अभिमन्यू पाटील, शत्रुघ्न काकडे, नरेश ठाकूर, गुरुनाथ गायकर, युवा नेते हॅप्पी सिंग, माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, नेत्रा पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, वासुदेव पाटील, समीर कदम, दीपक शिंदे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, प्रवीण बेरा, माजी सरपंच संजय घरत, महिला मोर्चाच्या अध्यक्षा साधना पवार, युवा मोर्चा खारघर अध्यक्ष नितेश पाटील, संतोष शर्मा, संध्या शारबिद्रे, अभिषेक भोपी, तेजस जाधव, अजिंक्य नवघरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, क्रीडाप्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते.

हि स्पर्धा खारघरमधील सेक्टर ७ येथील पंडित दीनदयाल उपाध्याय मैदानावर हि स्पर्धा होत असून या लीगमधील विजेत्या संघाला ५० हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला २५ हजार व चषक




आणि तृतीय क्रमांकास १० हजार रुपये व चषक असे मुख्य बक्षिसांचे स्वरूप आहे. परदेशात फुटबॉल प्रिमिअर लीग खेळली जाते, ती स्पर्धा लहान आयोजनातून उत्तरोत्तर मोठी झाली आणि या स्पर्धेचा जगभर नावलौकिक झाला. आपल्या देशात विशेषतः हा खेळ क्रिकेटप्रमाणे जास्त खेळला जात नाही. मात्र शारीरिक व्यायाम व तंदुरुस्तीच्या बाबतीत हा खेळ गणला जातो. या आयोजनाच्या प्रयत्नातून या खेळाची आवड तरुणाईमध्ये निर्माण होण्यासाठी पनवेल लीगच्या माध्यमातून प्रयत्न होत आहे. तरुणांना प्रोत्साहन देणारा आणि एकोपा निर्माण करणारा हा खेळ असल्याने या खेळाचाही प्रसार व प्रचार झाला पाहिजे आणि स्थानिक फुटबॉलपटूंना व्यासपीठ मिळाले पाहिजे या दृष्टिकोनातून या पनवेल फुटबॉल लीगचे आयोजन करण्यात आले असून या लीगमध्ये आठ निवडक संघ आपले कौशल्य सादर करत आहेत. खारघर किंग, तळोजा टायटन्स, कळंबोली वॉरिअर्स, कामोठे नाईट्स, पनवेल सिटी फुटबॉल क्लब, पनवेल पॅन्थर, न्यू पनवेल युनायटेड, खांदा कॉलनी स्ट्रायकर्स या आठ संघाचा आणि नामवंत खेळाडूंचा भरणा आहे. ही स्पर्धा केवळ खेळापुरती मर्यादित नाही तर तरुणांना खेळाकडे वळविणारा एक स्तुत्य उपक्रम ठरणार आहे. त्यामुळे पनवेल लीगच्या माध्यमातून माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त एक चांगला उपक्रम राबविण्यात आला आहे. यावेळी या आठ संघाच्या संघमालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी परेश ठाकूर यांच्या कार्याचा गौरव केला. ते पुढे म्हणाले कि, निरोगी शरीर सर्वात मोठी संपत्ती आहे. तरुणांनी व्यसनाधीन होऊ नये यासाठी स्वामी विवेकानंद यांनी मैदानी खेळाकडे वळण्याचा कायम आग्रह धरला. युवा शक्ती पुढे जाण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाज्वल राष्ट्रप्रेम आणि क्रीडा क्षेत्राला महत्व दिले. परेश ठाकूर आणि टीम सातत्याने विविध उपक्रमे राबवीत आहेत. त्या अनुषंगाने खेळाडू आणि खेळाला मानसन्मान देण्याचे काम केले जात आहे. या क्रीडानगरीचा देखावा राष्ट्रीय स्पर्धांप्रमाणे आहे. तरुणांना आकर्षित करणारा हा क्रीडा महोत्सव असून अशा दर्जेदार कार्यक्रमातून आणि सामाजिक सेवेतून परेश ठाकूर यांचे कार्य नेहमीच अधोरेखित झाले आहे, असे सांगतानाच परेश ठाकूर यांच्यावर असलेल्या प्रेमापोटी दरवर्षी मी वाढदिवसाला येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी आमदार विक्रांत पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले कि, पनवेल शहराचा विकास झाला पाहिजे हा दृष्टिकोन माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांचा कायम राहिला आहे. सभागृहनेते म्हणून आम्ही त्यांच्याबरोबर सभागृहात काम केले तेव्हा त्यांचा विकासाचा दृष्टिकोन आम्ही जवळून बघितला आहे. एखादा विषय घेतला कि त्यावर विचार करून फक्त आदेश देऊन सोडायचे नाही तर विषय पूर्ण होईपर्यंत त्याच्यावरती सातत्याने पाठपुरावा करायचा पिंड परेश ठाकूर यांचा राहिला आहे. त्यामुळे अधिकारी वर्गाला माहिती आहे कि विषय मार्गी लागेपर्यंत परेश ठाकूर यांचा पाठपुरावा कायम असतो त्यामुळे पूर्णत्वास नेण्याची मानसिकता अधिकारी वर्गाची असते. त्यामुळे मन लावून काम करणारा नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. पनवेलच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्याचे काम परेश ठाकूर यांनी केले त्याचबरोबर युवा शक्तीला विविध सामाजिक उपक्रमातून पुढे आणण्याचे कामही त्यांनी यशस्वीपणे केले असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तसेच शैक्षणिक, क्रीडा क्षेत्राचा दृष्टिकोनही त्यांचा उल्लेखही आमदार विक्रांत पाटील यांनी करत समाजसेवेचा वसा अखंड चालू राहण्यासाठी उदंड आयुष्य लाभो, अशा शब्दात शुभेच्छाही दिल्या. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी आपल्या भाषणात सांगितले कि, माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांचा वाढदिवस म्हणजे विविध सामाजिक उपक्रमाची पर्वणी असते. पनवेल महापालिकेचे नेतृत्व त्यांनी ज्या पद्धतीने केले आहे ते वाखाण्याजोगे आहे. आणि त्या अनुषंगाने त्यांनी महापालिका हद्दीत विकासाचा आलेख उंचावला. महापालिका हद्दीत विकासकामे करण्याबरोबरच समस्या सोडवण्याचे काम ते करत आले आहेत. फक्त अधिकाऱ्यांना सांगणेच नाही तर त्या विषयाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावण्याचे काम ते करतात. केंद्र असो कि राज्य भाजपच्यावतीने दिले प्रत्येक कार्यक्रम युवा नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी होत असतो. त्यांच्या कामाची पद्धत हि उत्तम आणि सामाजिक तळमळ असणारी आहे त्यामुळे आगामी पनवेल महापालिकेचा महापौर म्हणून परेश ठाकूर यांना आम्हाला पहायचे आहे, असेही अविनाश कोळी यांनी यावेळी म्हंटले.

पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांनी बोलताना सांगितले कि, पनवेल विधानसभा क्षेत्रात क्रीडा क्षेत्राला प्राधान्य देण्याचे काम होत आहे आणि त्यासाठी भारतीय जनता पार्टी रायगड आणि युवा मोर्चा सक्रियतेने काम करत आहे. विशेषत्वाने आमदार प्रशांत ठाकूर यांचे या विषयाकडे लक्ष असते ते नेहमी सामाजिक सोबत क्रीडा क्षेत्राला महत्व देत असतात. खेळ आणि खेळाडूंचा विकास होण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केला जात आहे. मागीलवर्षी अशाचप्रकारे माझ्या वाढदिवसानिमित्त विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच नमो चषकचे सलग दोन वर्षे आयोजन करून नवोदित खेळाडूंना व्यासपीठ मिळवून देण्यात आले असून एक लाखाहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेऊन हि स्पर्धा उत्स्फूर्तपणे मोठ्या प्रमाणात यशस्वी केली होती. भाजपने जेव्हा जेव्हा अशी कार्यक्रम दिली ती यशस्वी करण्याचे काम केले असल्याचेही त्यांनी नमूद केले. शारीरिक आणि मानसिक समाधान मिळत असल्याने क्रीडा क्षेत्राकडे तरुणाई वळत आहे, असे सांगत माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांची क्रिकेट अकादमी पनवेलमध्ये सुरु झाली आहे, अशाच प्रकारे पनवेल महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी क्रीडा संकुल आणि मैदान विकसित करण्याचे काम हाती घेण्यात येत असल्याचीही माहिती त्यांनी या स्पर्धेच्या निमित्ताने दिली. या सोहळयाचे प्रास्ताविक युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी केले.

## भूमिहीन दारिद्र्यरेषेखालील आदिवासींचे सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत जमीन विक्रीस इच्छुक असणाऱ्या जमीन मालकांनी करावयाचे अर्ज

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी, प्रतिनिधी :** भूमिहीन दारिद्र्यरेषेखालील आदिवासींचे सबलीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन आदिवासी कुटूंबाना 4 एकर जिरायती (कोरडवाहू) किंवा 2 एकर बागायती (ओलिताखालील) जमिन देण्याबाबत प्रस्तावित आहे. या योजना आदिवासी विकास विभागाच्या 28 जुलै 2021 रोजीच्या शासन निर्णयान्वये 100 टक्के अनुदानित आहे.

त्याचप्रमाणे सदरील शासन निर्णयानुसार जमिन विक्रीसाठी इच्छुक जमिन मालकांने खालील प्रमाणे कागदपत्र सादर करावेत. अर्जदाराचा जमीन विक्री करणारा/ जमीन मालक विहित नमुन्यांतील अर्ज, शेतजमिनीवर कोणताही बोजा नसल्याबाबत संबंधित तलाठी यांचे प्रमाणपत्र व सातबारा उत्तारा, संबंधित परिसरातील प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा सेवा सोसायटीची कुठल्याही प्रकारची थकबाकी नसल्याबाबत प्रमाणपत्र, प्रस्तावित विक्रीच्या शेतजमिनीचे क्षेत्रफळ बरोबर असल्यास मोजणी विभागाचे टाचण व नकाशासह अहवाल, जिल्हा समितीपुढे सादर केलेल्या प्रस्तावातील शेत जमिन समितीने खरेदी करणे बंधनकारक असणार नाही याची शेत जमिन विक्री करणा-या शेतक-यास जाणीव असल्याबाबतचे घोषणापत्र व जमिनीच्या खरेदी प्रक्रियेमुळे कोणताही नुकसान भरपाई मागणार नसल्याबाबत व सदर जमिनीबाबत कोणत्याही न्यायालयात वाद सुरु नसल्याबाबत विक्री प्रस्तावातील जमिन कुठेही गहाण नसल्याबाबतचे संबंधित शेतजमिन विक्री करणा-या जमिन मालकाचे शपथपत्र, जमिन विक्रीच्या अर्जावर शेतजमिन विक्री करणा-या व्यक्तीशिवाय कुटूंबातील दोन व्यक्तीच्या (उदा. सख्खे भाऊ, पत्नी, मुले. इ.) स्वाक्षरी असाव्यात व त्यांचे विक्रीबाबत ना-हरकत प्रमाणपत्र.वरील प्रमाणे जमिन विक्रीस काढलेल्या मालकाने कागदपत्रे जोडून परिपूर्ण प्रस्ताव प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवास विकास प्रकल्प, पेण रॉयल ग्रॅन्डीअर बिल्डींग, पहिला मजला, रामवाडी पेण जि. रायगड या कार्यालयात 30 जुन 2025 पर्य कार्यालयीन वेळेत सादर करावेत. अधिक माहितीसाठी या कार्यालयाचा दुरध्वनी ०२१४३-२५२५१९ वर संपर्क करावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प ता. पेण जि. रायगड यांनी केले आहे.

## रिसोड येथे चिमण्यांची घरकुल योजना कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
**रणजितसिह ठाकुर :** सुखाने संसार थाटता यावा या अनुषंगाने कोणत्याही पती-पत्नीचे सर्वात महत्वाचे तसेच जीवनावश्यक स्वप्न म्हणजे आपलं एक छोटसं घरकुल असावं. स्वत:च्या घराविषयी अनेक स्वप्न रंगविले जातात नव्हे तर ते पूर्ण सुध्दा केले जातात. सुरक्षिततेच्याअनुषंगाने हि बाब फक्त मानवाकरीताचं लागु होत नाही तर काही मोजके जलचर व भूचर प्राणी वगळता वंशवृध्दीच्या दृष्टीकोनातून प्रत्येक पशु-पक्ष्यांना सुध्दा वाटतं कि आपलं पण स्वतःचं घरटं असावं.पण आधुनिक युगातील वाढत्या लोकसंखेच्या समप्रमाणात वाढत्या वसाहती तसेचं टोलेजंग घरामुळे अनेक पशु-पक्ष्यांचे अधिवास नष्ट झाले आहेत किंवा केल्या जात आहेत असे म्हणने वावगे होणार नाही.गेल्या दोन दशकापासून अनेक माध्यमाद्वारे ओरड होत आहे कि चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे पण फक्त कोरडी ओरड करून किंवा कागदोपत्री चिमणी दिवस साजरा करून खरोखरच चिमण्यांची संख्या वाढेल का?तर मुळीच नाही.त्या करीता प्रत्यक्ष कृतीची जोड द्यावी लागेल हे तेवढेच खरे.साधारणतः तीस वर्षा अगोदर सूर्योदयापूर्वी जेथे प्रत्येकाच्या अंगणात घोळक्याने चिमण्यांचे थवे चिव-चिव करतांना पाहुन आनंदीत चेहर्याने घरातील गोंडस मुले सुध्दा हात उंचावून त्यांना प्रतिसाद देत असतं,ते थवे आजरोजी लुप्त झाली आहेत.चिऊताई स्वतः तीच्या दाण्या- पाण्याचा प्रश्न सोडविण्यास सक्षम आहे,पण खरा प्रश्न आहे त्यांच्या वास्तव्याचा.खोपा करण्यास जागाचं मिळत नसेल तर वंश वृध्दी होईल कशी?हा एक चिंतनीय प्रश्न आहे.पुर्वीच्या टिन-पत्र्याच्या किंवा माळवदाच्या घरामध्ये अनेक ठिकाणी चिमण्यांना वास्तव्य करण्याकरीता सहजतेने जागा उपलब्ध होत असे,पण आजकालच्या योजनाबध्द पध्दतीने बांधलेल्या सुसज्ज घरामध्ये चिमणीचं काय पण मुंगी सुध्दा प्रवेश करू शकत नाही. सद्धस्थितीत केन्द्र व राज्यशासना कडुन घरकुल योजनेच्या अंतर्गत गरजूंना अडीच लाखापर्यंत अनुदान मिळत आहे.त्यापैकी फक्त अडीचशे रूपये खर्च करून आपल्या चिऊताई करीता घरात नाही पण किमान भिंतीवर तरी एखादं घरटं लटकवा अशी विनंती वजा सुचना वृक्षप्रेमी गजानन मुलंगे,पक्षीप्रेमी विनोद बांगर व अध्यापक गुणवंत थोरात यांनी समस्त पर्यावरण प्रेमींना केली.रिसोड शहरामध्ये आतापर्यंत 255 चिमण्यांची घरटी लावण्याची नोंद झाली,हि उल्लेखनीय बाब आहे.




## चणेरा येथील न्यू इंग्लिश स्कूल शाळेचा इयत्ता दहावीचा घवघवीत निकाल

**दैनिक युवक आधार**
**रोहा/ रायगड :** "ज्ञान,विज्ञान, आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार शिक्षणमहर्षी."डॉ. बापूजी साळुंखे"न्यू इंग्लिश स्कूल चणेरे, ता. रोहा, जिल्हा रायगड येथील विद्यालयाने इयत्ता दहावीच्या परीक्षेच्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.दहावी बोर्ड परीक्षेचा सरासरी निकाल 94.93% लागला आहे. प्रथम क्रमांक.गायकर साक्षी विष्णू शेकडा गुण 85.40%,द्वितीय क्रमांक टावरी साक्षी अशोक शेकडा गुण : 78.40%, तृतीय क्रमांक महाडिक सोनम गोपीनाथ *शेकडा गुण : 77.00%* वरील प्रथम तीन क्रमांक विद्यालयात आले आहे . यावेळी मुख्याध्यापक के. बी. पाटील यांनी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे कौतुक करून चांगले यश मिळवल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. तसेच सर्व विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक, शालेय समितीचे अध्यक्ष ,उपाध्यक्ष, सदस्य ,संस्था पदाधिकारी, संस्था निरीक्षक, ग्रामस्थ, हितचिंतक ,विभाग प्रमुख यांच्याकडून यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.




## कारचा दरवाजा उघडल्याने मोटरसायकल वरील इसम जखमी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** कारचा दरवाजा अचानक उघडल्याने मोटरसायकल दरवाजाला धडकली. यात काशिनाथ माने (वय 57) हे जखमी झाले. या अपघाता प्रकरणी कारचालका विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

12 मे रोजी काशिनाथ सुदाम माने हेरंब सोसायटी येथून हिरो ग्लॅमर मोटरसायकल एम एच ०६ एडी 4837 वरून पनवेल मार्केटला जात होते. यावेळी पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायर कार क्रमांक एम एच 43 बीएक्स 7938 ही रस्त्याच्या कडेला उभी करून चालकाने स्विफ्ट कारचा दरवाजा अचानक उघडला. यावेळी काशिनाथ माने हे मोटरसायकल सह दरवाजाला धडकले आणि खाली पडले. यात त्यांच्या खांद्याला आणि उजव्या गुडघ्याला दुखापत झाली. या प्रकरणी कलीम मोबीन खान यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## मोबाईलने आणि दगडाने मारहाण केल्याप्रकरणी चौघाविरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** भावाला मारहाण केल्याने विचारणा केली असता चौघांनी मोबाईल, दगड आणि लाथाबुक्याने मारहाण केल्याप्रकरणी मनीष तिवारी, तुषार तिवारी, आरती तिवारी, जगदीश तिवारी यांच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. साईनाथ शिंदे याचा सेंट जोसेफ शाळा सेक्टर चार कळंबोली समोर वाद झाला. यावेळी साक्षी आणि श्रावणी या तेथे गेल्या. यावेळी त्यांचा भाऊ साईनाथ याला त्यांनी विचारले असता जगदीश तिवारी याचा दुसऱ्या मुलासोबत वाद सुरू होता तो सोडवण्यासाठी साईनाथ गेला असता जगदीश याने त्याचे वडील मनीष, चुलते तुषार आणि आई आरती यांनी त्याला हाताबूक्याने मारहाण केल्याचे सांगितले.

त्यानंतर मनीष तिवारी यांनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. शिवीगाळ करू नका असे साक्षीने सांगितले असता मनीषने तिचा मोबाईल खेचला आणि डोक्यात मारला. त्यानंतर दगड उचलून डोक्यात मारला. त्यावेळी मनीष, आरती, जगदीश, तुषार यांनी शिवीगाळ करून लाथाबुक्याने मारहाण केली.